**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक २४ ऑगस्ट २०२५**

**ठळक बातम्या**

- **राज्याच्या प्रत्येक तालुक्यातील 10 गावे स्मार्ट व इंटेलिजंट करणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची राज्यातल्या पहिल्या स्मार्ट आणि इंटेलिजंट गाव नागपूरच्या सातनवरीच्या उद्‌घाटनप्रसंगी घोषणा.**
- **अखिल भारतीय विधिमंडळ पीठासीन अधिकाऱ्यांच्या दोन दिवसीय परिषदेचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत उद्‌घाटन.**
- **बुलढाण्याच्या शेगाव इथं आजपासून ऋषीपंचमी उत्सवाला सुरुवात**.
- **क्रिकेटपटू चेतेश्वर पुजारा याची आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती.**

**स्मार्ट व्हिलेज-सातनवरी**

आत्मनिर्भर भारताच्या दिशेन पुढे जात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग करून शेती, आरोग्य, शिक्षण आदी महत्वाच्या सुविधा सातनवरी गावात उपलब्ध करून देत समृद्ध गावाचे रोल मॉडेल उभे राहिले असून लवकरच राज्याच्या प्रत्येक तालुक्यातील 10 गावे स्मार्ट आणि इंटेलिजंट करण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूरमध्ये केली. केंद्रीय दूरसंचार मंत्रालयांतर्गत कार्यरत व्हाईस ऑफ इंडियन कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी एंटरप्रायजेसन देशांतर्गत 24 कंपन्यांच्या संघटनांसोबत एकत्र येत राज्य शासन आणि नागपूर जिल्हा प्रशासनाच्या मदतीन सातनवरी गावात आधुनिक तंत्रज्ञान आधारित सेवा उपलब्ध करून देत या गावाला देशातील पहिले स्मार्ट आणि इंटेलिजंट गाव बनविले आहे. प्रायोगिक तत्वावर उभारण्यात आलेल्या या स्मार्ट आणि इंटेलिजंट गावाचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला. त्यावेळी ते बोलत होते.......

***सातनवरीचा हा यशस्वी प्रयोग बघून आम्ही असं ठरवलं आहे, पहिल्या टप्प्यामध्ये प्रत्येक तालुक्यात नागपूरच्या करूच पण महाराष्ट्राच्या प्रत्येक तालुक्यामध्ये 10 गावं ही आता स्मार्ट आणि इंटेलिजंट आम्ही करू म्हणजे जवळपास साडेतीन हजार पेक्षा जास्त गावं या ठिकाणी आम्ही स्मार्ट आणि इंटेलिजंट करू आणि मग पुढच्या टप्प्यात सगळीच गावं आम्हाला ती करायची आहे.***

याप्रसंगी महसूल मंत्री तथा नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, खासदार श्यामकुमार बर्वे, उपस्थित होते. नागपूर ते अमरावती या राष्ट्रीय महामार्गावर वसलेले सातनवरी या गावातील शेतकरी ड्रोन आणि सेंसर आदींचा उपयोग करून माती परिक्षण, फवारणी, खते आदींचे योग्य नियोजन करून शेतीचे उत्पादन खर्च कमी करून उत्पन्न वाढवू शकतील. गावातील पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता सुधारल्यान गावकऱ्यांचे आरोग्य सुधारेल. टेलिमेडिसिन आदींचा उपयोग होवून गावातच आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध होणार आहे. गावात प्राथमिक शिक्षणात कृत्रिम बुद्धीमत्ता आणि स्मार्ट शिक्षणाचा उपयोग होवून वैश्विक ज्ञान विद्यार्थ्यांना मिळेल आणि सातनवरी गाव लवकरच देशात एक रोल मॉडेल म्हणून नावारूपाला येईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी

स्पष्ट केले. जिल्हा परिषद नागपूरच्या वतीन बांधण्यात येत असलेल्या 40 अंगणवाड्यांचे ई-भूमिपूजन आणि 15 व्या वित्त आयोगातून प्राथमिक आरोग्य वर्धनी उपकेंद्रात बसविलेल्या सौर पॅनलच ऑनलाईन लोकार्पणही मुख्यमंत्र्यांचे हस्ते यावेळी करण्यात आले.

**पीठासीन अधिकारी दोन दिवसीय परिषद**

स्वातंत्र्य प्राप्तीप्रमाणच देशाची लोकशाही अबाधित ठेवणं हेही महत्वाचं असून विठ्ठलभाई पटेल यांनी भारतीय संकल्पनांवर आधारित लोकशाहीचा पाया घालण्याचं काम केलं, अस केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज नवी दिल्लीत अखिल भारतीय विधिमंडळ पीठासीन अधिकाऱ्यांच्या दोन दिवसीय परिषदेचं उदघाटन केलं, त्यावेळी ते बोलत होते. देशाच्या संसदेची आणि पीठासीन अधिकाऱ्यांची प्रतिष्ठा राखणं महत्वाचं असून विधिमंडळं ही जनतेचा आवाज पोहोचवण्याचं माध्यम बनायला हवी, असं ते म्हणाले. देशाच्या केंद्रीय कायदेमंडळाचे पहिले अध्यक्ष म्हणून विठ्ठलभाई पटेल यांनी पदभार स्वीकारल्याच्या घटनेला १०० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्तानं ही परिषद दिल्ली विधानसभेत आयोजित केली आहे. देशभरातल्या २९ राज्यं विधानसभांचे अध्यक्ष आणि ६ राज्यांच्या विधानपरिषदेचे सभापती तसच उपसभापती या परिषदेत सहभागी होणार आहेत.

**सेंद्रीय शेती**

शेती क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचं नवं पर्व सुरू झालं असून शेतकऱ्यांनी या तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर द्यावा, तसंच विषमुक्त सेंद्रिय शेतीकडं वळावं, असं आवाहन उपमुख्यमंत्री पवार यांनी केलं आहे. पुण्यात आयोजित महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागाईतदार संघाच्या पासष्ठाव्या वार्षिक अधिवेशनात ते बोलत होते. राज्यात द्राक्ष उत्पादन वाढावं यासाठी द्राक्ष बागाईतदार संघाच्या माध्यमातून करण्यात येणारं कार्य उल्लेखनीय असल्याचं त्यांनी सांगितलं. राज्यातले शेतकरी केंद्रबिंदू मानून सरकार काम करत आहे, असं कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यावेळी म्हणाले. द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांची उत्पन्नाची पातळी वाढविण्यासाठी सरकारच्या माध्यमातून विविध योजना राबवण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

**एकात्मिक हवाई संरक्षण शस्त्रप्रणाली**

डीआरडीओ अर्थात संरक्षण संशोधन आणि विकास संघटनेनं काल दुपारी साडेबारा वाजता ओदिशा किनाऱ्याजवळ आय.ए.डी.डब्लू.एस. अर्थात एकात्मिक हवाई संरक्षण शस्त्रप्रणालीची पहिली यशस्वी उड्डाण चाचणी केली. या बहुस्तरीय स्वदेशी शस्त्र प्रणालीमध्ये जमिनीतून आकाशात मारा करणारी क्षेपणास्त्र प्रणाली, कमी पल्ल्याची प्रगत हवाईसंरक्षण क्षेपणास्त्र प्रणाली आणि लेसर-आधारित निर्देशित ऊर्जा शस्त्र यांचा समावेश आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आय. ए. डी. डब्लू. एस. च्या यशस्वी चाचणी बद्दल डी आर डी ओ, सशस्त्र दलं तसंच उद्योग क्षेत्राचं अभिनंदन केलं.या चाचणीमुळं देशाची हवाई संरक्षण क्षमता आता अधिक बळकट झाली असून,

महत्वाच्या स्थळांच्या सुरक्षेसाठी शत्रूच्या हवाई हल्ल्यांवर मात करण्याची आपली संरक्षण सिद्धता अधिक विकसित होईल, असं राजनाथ सिंह म्हणाले.

**ऋषीपंचमी**

बुलढाणा जिल्ह्यातील विदर्भाची पंढरी म्हणून प्रसिद्ध असलेल्या बुलडाणा जिल्ह्यातील संत नगरी शेगाव इथ आज २४ ऑगस्ट पासून संत श्री गजानन महाराजांच्या ११५ व्या पुण्यतिथीचे औचित्य साधून ऋषीपंचमी उत्सवाला सुरुवात झाली. आजपासून सुरु झालेल्या या ५ दिवसीय ऊत्सवामध्ये विविध धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहेत. दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांकरिता गजानन महाराज संस्थांकडून विशेष व्यवस्था करण्यात आली आहे यामध्ये मंदिर परिसरात एकेरी मार्गाची व्यवस्था तसेच दर्शनासाठी श्रीमुख दर्शन,कळस दर्शन, समाधी दर्शन अशी सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. दरम्यान महाराजांच्या दर्शनासाठी येणारे भाविकानी आपले मनोगत व्यक्त करतांना समाधान व्यक्त केले......

***मी जयश्री प्रशांत सोनवणे मी जळगावहून आले आहे. दरवर्षी आम्ही शेगावला दोन वेळा वर्षातून येत असतो. आम्हाला इथली सेवा आणि इथली स्वच्छता सगळ्यात जास्त आवडते.***

ऋषीपंचमीच्या दिवशी संत श्री गजानन महाराजांच्या पुण्यतिथी महोत्सवाची सांगता होईल.

**चेतेश्वर पुजारा निवृत्ती**

भारतीय क्रिकेट संघातील फलंदाज चेतेश्वर पुजारा यान आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या सर्व प्रकारातून निवृत्ती जाहीर केली आहे. क्रिकेटन मला अमूल्य संधी, अनुभव, ध्येय आणि प्रेम दिलं तसंच माझ्या राज्य आणि देशाचं प्रतिनिधित्व करण्याची संधी दिली. अशा शब्दात पुजारान समाजमाध्यमावर आपल्या भावना व्यक्त केल्या. प्रत्येक चांगल्या गोष्टीला शेवट असतो, निवृत्त होताना माझ्या मनात कृतज्ञतेची भावना आहे, असं पुजारा म्हणाला. चेतेश्वर पुजारान १०३ कसोटी क्रिकेट सामन्यात ४३ पूर्णांक ६० च्या सरासरीन ७ हजार १९५ धावा केल्या. यात १९ शतकं आणि ३५ अर्धशतकांचा समावेश आहे. कसोटी क्रिकेटमधे सर्वाधिक धावा करणारा पुजारा हा भारतीय संघातला आठवा खेळाडू आहे. २०१० मधे ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या सामन्यात पुजारानं कसोटी पदार्पण केलं होतं, पहिल्याच सामन्यात त्याने ७२ धावांची उत्कृष्ट खेळी केली होती.

**सेवाग्राम विकास आराखडा**

वर्धाच्या सेवाग्राम विकास आराखड्यांतर्गत करण्यात आलेल्या पवनार येथील धाम नदी परीसरातील कामांची दुरस्ती करावी. पवनार येथे येणाऱ्या पर्यटकांना सोईसुविधा निर्माण करुन देण्यासाठी झालेल्या कामांची दुरुस्ती करण्यासोबतच विद्युतीकरणाची कामे तत्काळ करावी, अशा सूचना वर्धेचे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केल्या. डॉ. पंकज भोयर

यांनी सेवाग्राम विकास आराखड्यांतर्गत पवनार येथील धाम नदी काठावर करण्यात आलेल्या कामांची पाहणी केली. यावेळी त्यांनी सूचना केल्या.

**हवामान**

पुढल्या अठ्ठेचाळीस तासांत विदर्भात बऱ्याच ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता पुणे वेधशाळेन वर्तवला आहे. दरम्यान 26 ते 28 ऑगस्ट दरम्यान पूर्व विदर्भातील सर्वच जिल्ह्याच्या तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागान वर्तवली असून या कालावधीत यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

*****